# मुंबई विद्यापीठ

**No. Aff./ICC/ (2020-21)/०७/ of 2021**

## परिपत्रक:

**विषय:— महाविद्यालयाच्या सुरक्षा अंकेक्षनाबाबत.**

**संदर्भ:—(१) विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल यांचे क्र. विससं/उशि/कोविप/मशि/२०२१/२५४ दिनांक ०५ फेब्रुवारी, २०२१ रोजीचे पत्र.**

**(२) शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, पुणे यांचे क्र. उशिसं/२०२०—२१/ सुरक्षा अंकेक्षण/ मवि—०१/ १३६९ दिनांक ०३ फेब्रुवारी, २०२१ रोजीचे पत्र.**

उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयांचे अवलोकन करावे व त्याअनुषंगाने मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित पदव्युत्तर पदवी, पदवी, पदविका महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, कोव्हिड—१९ च्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या अनुषंगाने लागू करण्यात आलेल्या टाळेबंदीनंतर प्रत्यक्ष महाविद्यालये सुरू होण्यापुर्वी विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने काही खबरदारी घेणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने दक्षतेच्या उपाययोजना म्हणून महाविद्यालयांनी त्यांच्या इमारतींचे व परिसराचे खालीलप्रमाणे अंकेक्षण करणे आवश्यक आहे.

१. विद्युत पुरवठा व उपकरणे सेवेचे अंकेक्षण
२. इमारत बांधकाम मजबूती व रचना अंकेक्षण
३. हरीत अंकेक्षण
४. पाणी पुरवठा अंकेक्षण

उपरोक्त बाबतीत मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शैक्षणिक संस्थांकडून काटेकोरपणे पालन करण्यात यावे व याबाबत मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित पदव्युत्तर पदवी, पदवी, पदविका महाविद्यालयांचे प्राचार्य यांना विनंती करण्यात येते की, वरीलप्रमाणे नमूद अंकेक्षणे सुरक्षतेचे उपाययोजना म्हणून महाविद्यालये उघडण्याआधी तातडीने करण्यात येउन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल, उपकुलसचिव, महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग, कक्ष क्र. २०६, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई— ४०० ०३२ यांना कळविण्यात यावा.

मुंबई—४०० ०३२
0L फेब्रुवारी, २०२१

(डॉ बळीराम गायकवाड)
प्र. कुलसचिव

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित पदव्युत्तर पदवी, पदवी, पदविका महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक.